महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५
परीक्षा दि० ०४ जानेवारी, २०२६

**2025** **M21**

**A** → संच क्रमांक

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET NO.**

# प्रश्नपुस्तिका
# सामान्य क्षमता चाचणी

**वेळ : 1 ( एक ) तास**

**एकूण प्रश्न : 100**
**एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉल्पेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ↑ केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | ↑ शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील.''**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अशी प्रश्नपत्रिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही; असे केल्यास ''महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा ( अनुचित मार्गांस प्रतिबंध ) अधिनियम २०२४'' मधील तरतुदीनुसार सदर व्यक्ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. ब्रिटिशांनी मुझफ्फरपूर बॉम्ब खटल्या संबंधातील लिखाणाबाबत ________ यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल केला होता.

(1) लोकमान्य टिळक (2) अच्युतराव कोल्हटकर

(3) शिवरामपंत परांजपे (4) पृथ्वीगीर हरिगीर

The British filed a case of sedition against ________ for his writing regarding the Muzaffarpur bomb case.

(1) Lokmanya Tilak (2) Achyutrao Kolhatkar

(3) Shivrampant Paranjape (4) Prithvigir Harigir

---

2. प्रार्थना समाजाच्या वतीने खालीलपैकी कोणती सामाजिक कामे केली होती ?

(a) ना.म. जोशी यांनी 'सोशल सर्व्हीस लिग' स्थापून मजुरांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले.

(b) देशसेवेसाठी चांगले कार्यकर्ते निर्माण करण्याच्या उद्देश्याने नामदार गोखले यांनी 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी' ही संस्था स्थापन केली.

(c) या समाजाच्या वतीने नाशिक येथे अनाथआश्रम काढले.

(d) अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशन ही संस्था स्थापन केली.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) फक्त (2) (b) आणि (c) फक्त

(3) (a), (b) आणि (d) फक्त (4) (b), (c) आणि (d) फक्त

Which of the following social works were done by Prarthana Samaj ?

(a) N.M. Joshi tried to improve the condition of labourers by establishing the 'Social Service League'.

(b) Namdar Gokhale Founded the 'Servants of India Society' with the aim of producing good worker's for the service of the country.

(c) An Orphanage was opened in Nashik on behalf of this Samaj.

(d) Maharshi Vitthal Ramaji Shinde Founded the Depressed Classes Mission for the upliftment of the untouchables.

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only

(3) (a), (b) and (d) only (4) (b), (c) and (d) only

---

3. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांसंदर्भात खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(a) सक्तीचा व मोफत शिक्षणाचा कायदा केला.

(b) विविध कला व कलाकारांना आश्रय दिला.

(c) विधवा पुनर्विवाह कायदा पारित केला.

(d) कोल्हापुरात व्यापारासाठी 'शाहूपुरी' या व्यापारपेठेची स्थापना केली.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) आणि (d) फक्त (2) (b), (c) आणि (d) फक्त

(3) (a) आणि (b) फक्त (4) (a), (b), (c) आणि (d)

Which of the following statements are **true** about Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj ?

(a) He legislated a compulsory and free education.

(b) He gave patronage to different arts and artists.

(c) He legalised widow re-marriage act.

(d) He established 'Shahupuri' market for the traders in Kolhapur.

**Answer Options :**

(1) (a), (b) and (d) only (2) (b), (c) and (d) only

(3) (a) and (b) only (4) (a), (b), (c) and (d)

---

4. खालीलपैकी कोणत्या नेत्यांनी आयटक या कामगार संघटनेचे अध्यक्षपद भूषविले **नाही** ?

(a) बी.टि. रणदिवे (b) सरोजिनी नायडू

(c) सी.आर. दास (d) जवाहरलाल नेहरू

**पर्यायी उत्तरे :**

(1) (b), (c) आणि (d) (2) (a) आणि (d)

(3) (b) आणि (d) (4) (a)

Which of the following leaders have **not** served as Presidents of AITUC, a labour union ?

(a) B.T. Randive (b) Sarojini Naidu

(c) C.R. Das (d) Jawaharlal Nehru

**Answer Options :**

(1) (b), (c) and (d) (2) (a) and (d)

(3) (b) and (d) (4) (a)

---

5. जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | मुकुंदराव पाटील | (i) | विजयी मराठा |
| (b) | वा.रा. कोठारी | (ii) | जागृती |
| (c) | भगवंत पाळेकर | (iii) | जागरूक |
| (d) | श्रीपतराव शिंदे | (iv) | दीनमित्र |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

Match the following.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Mukundarao Patil | (i) | Vijayi Maratha |
| (b) | V.R. Kothari | (ii) | Jagruti |
| (c) | Bhagavant Palekar | (iii) | Jagaruk |
| (d) | Shripatrao Shinde | (iv) | Dinmitra |

**Answer Options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (3) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

---

6. 1887 मध्ये मद्रास येथे झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन कोणाच्या अध्यक्षतेखाली झाले ?

(1) सर ॲलन ह्युम (2) दादाभाई नौरोजी
(3) बद्रुद्दीन तय्यबजी (4) सर विल्यम वेडरबर्न

Who was the Chairperson of Indian National Congress session held in 1887 at Madras ?

(1) Sir Allen Hume (2) Dadabhai Naoroji
(3) Badruddin Tayabji (4) Sir William Wedderburn

---

7. **अचुक** जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | भारतीय सुशासनाचा कायदा –1858 | (i) | मुस्लिमांना स्वतंत्र मतदार संघ |
| (b) | भारतीय परिषद (कौंसिल) कायदा - 1909 | (ii) | मंत्रिमंडळ पद्धतीचा पाया |
| (c) | भारत सरकारचा कायदा - 1919 | (iii) | प्रांतात द्विदल शासन पद्धती |
| (d) | भारत सरकारचा कायदा - 1935 | (iv) | भारतमंत्री पदाची निर्मिती |
| | | (v) | केंद्रात द्विदल शासन पद्धती |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (v) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iv) | (i) | (iii) | (v) |
| (4) | (iv) | (v) | (i) | (ii) |

Match the **correct** pairs.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | An Act for the better Government of India - 1858 | (i) | Independent constituency for Muslims |
| (b) | Indian Council Act of - 1909 | (ii) | Foundation of Cabinet System |
| (c) | Government of India Act of - 1919 | (iii) | Dyarchy system in State |
| (d) | Government of India Act of - 1935 | (iv) | Created the post Secretary of State for India |
| | | (v) | Dyarchy System in Central |

**Answer Options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (v) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iv) | (i) | (iii) | (v) |
| (4) | (iv) | (v) | (i) | (ii) |

8. 1857 च्या उठावानंतर बंगालमधील नीळ उत्पादक शेतकऱ्यांना मळेवाल्याविरुद्ध उठावात यश मिळण्याचे कारण कोणते ?
(a) उपक्रमशिलता व सहकार्य
(b) संघटना व शिस्त
(c) मळेवाल्यात पडलेली फूट
(d) हिंदू-मुस्लिम शेतकरी ऐक्य

**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (b), (c) आणि (d)
(2) फक्त (a), (b) आणि (d)
(3) फक्त (a), (b) आणि (c)
(4) फक्त (a) आणि (c)

What was the reason the indigo farmers in Bengal succeeded in revolting against the landlords after the revolt of 1857 ?
(a) Entrepreneurship and co-operation
(b) Organization and discipline
(c) A split in the landlords
(d) Hindu-Muslim peasants unity

**Answer Options :**
(1) Only (b), (c) and (d)
(2) Only (a), (b) and (d)
(3) Only (a), (b) and (c)
(4) Only (a) and (c)

---

9. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | मोपल्याचे बंड | (i) | खानदेश (महाराष्ट्र) |
| (b) | कोलांचा उठाव | (ii) | केरळ |
| (c) | संथाळांचा उठाव | (iii) | बिहार |
| (d) | भिल्लांचा उठाव | (iv) | बंगाल |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

Match the pairs :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Moplah rebellion | (i) | Khandesh (Maharashtra) |
| (b) | Kol uprising | (ii) | Kerala |
| (c) | Santhal uprising | (iii) | Bihar |
| (d) | Bhil uprising | (iv) | Bangal |

**Answer Options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

10. __________ या मुंबई पोलीस कमिशनरने ब्रिटीश राजवटीविरुद्ध कारवाया करणाऱ्यांना फाशी देण्यासाठी वधस्तंभ उभारला होता.

(1) सर अॅन्ड्र्यू फ्रेझर (2) जॉन नॉटबोअर
(3) रिचर्ड मायन (4) चार्ल्स फोर्जेट

__________ was the Police Commissioner of Bombay had erected a gallows to hang those who took action against the British rule.

(1) Sir Andrew Fraser (2) John Notboer
(3) Richard Mayne (4) Charles Forget

---

11. खालील विधानांचा विचार करा :

(a) रायरेश्वरपासून शिंगणापूरपर्यंत पसरलेल्या रांगेला शंभू-महादेव डोंगररांग असे म्हणतात.
(b) सातपुडा पर्वतरांगेमुळे नर्मदा व तापी नदीचे खोरे अलग झालेले आहे.
(c) हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांगेमुळे गोदावरी व भीमा नदीचे खोरे अलग झालेले आहे.
(d) गोदावरी व तापी नदीच्या खोऱ्यांना वेगळी करणारी सातमाळा-अजिंठा डोंगररांग आहे.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत ?

(1) फक्त (a) विधान बरोबर आहे. (2) (a) आणि (b) दोन्ही बरोबर आहेत.
(3) विधान (a), (b) आणि (c) बरोबर आहेत. (4) वरील सर्व विधाने बरोबर आहेत.

Consider the following statements :

(a) The range extending from Raireshwar to Shingnapur is called Shambhu-Mahadev mountain range.
(b) The river basins of Narmada and Tapi are separated by the Satpura mountain range.
(c) The Godavari and Bhima river basins are separated by the Harishchandra-Balaghat mountain range.
(d) The Satmala-Ajantha mountain range separates the Godavari and Tapi river basins.

Which of the statements given above is/are **correct** ?

(1) Only Statement (a) is true. (2) Statements (a) and (b) both are true.
(3) Statements (a), (b) and (c) are true. (4) All of the above Statements are true.

---

12. 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणत्या तीन जिल्ह्यांमध्ये ऋणात्मक लोकसंख्येचा वृद्धीदर दर्शवितो ?

(1) मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी
(2) मुंबई शहर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी
(3) मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग आणि पालघर
(4) मुंबई शहर, सिंधुदुर्ग आणि पालघर

Which of the following three districts from Maharashtra recording negative growth rate of population as per 2011 census ?

(1) Mumbai Suburban, Sindhudurg and Ratnagiri
(2) Mumbai City, Sindhudurg and Ratnagiri
(3) Mumbai Suburban, Sindhudurg and Palghar
(4) Mumbai City, Sindhudurg and Palghar

---

**13.** संचालनालय, खनिज विभाग, नागपूर यांच्या 2014 च्या आकडेवारी प्रमाणे महाराष्ट्रात लोहखनिजाचे साठे कोणत्या जिल्ह्यात अधिक आहेत ?

(1) भंडारा (2) सिंधुदुर्ग (3) गडचिरोली (4) चंद्रपूर

Which district in Maharashtra have more iron ore mineral deposits as per statistics of 2014 by Directorate, Mining Department, Nagpur ?

(1) Bhandara (2) Sindhudurg (3) Gadchiroli (4) Chandrapur

---

**14.** जोड्या जुळवा.

| | **स्तंभ A (कोपेन हवामान)** | | **स्तंभ B (हवामान प्रकार)** |
|---|---|---|---|
| (a) | Cwg | (i) | उष्ण वाळवंट |
| (b) | BWhw | (ii) | थंड आणि आर्द्र हिवाळा |
| (c) | Dfc | (iii) | उष्ण कटिबंधीय मोसमी |
| (d) | Amw | (iv) | मेसोथर्मल |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (iii) | (ii) | (iv) | (i) |

Match the following.

| | **Column A (Coppen climate)** | | **Column B (Climate type)** |
|---|---|---|---|
| (a) | Cwg | (i) | Hot Desert |
| (b) | BWhw | (ii) | Cold and humid winter |
| (c) | Dfc | (iii) | Tropical monsoon |
| (d) | Amw | (iv) | Mesothermal |

**Answer Options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (iii) | (ii) | (iv) | (i) |

---

15. खालील विधाने विचारात घ्या.

(a) चिनाब नदी झोझीला खिंडीजवळ उगम पावते.

(b) रावी नदीचा उगम रोहतांग खिंडीजवळ आहे.

(c) सतलज नदीचा उगम रकास तलावाजवळ आहे.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) आणि (c) फक्त (2) (a) आणि (b) फक्त (3) (b) आणि (c) फक्त (4) फक्त (c)

Consider the following statements :

(a) The Chenab river originates near the Zojila Pass.

(b) The source of Ravi river is near the Rohtang Pass.

(c) The source of Sutluj river is near Rakas lake.

Which of the following statements is/are **correct** ?

(1) (a) and (c) only (2) (a) and (b) only (3) (b) and (c) only (4) Only (c)

---

16. खालीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने महाराष्ट्राच्या पर्जन्याबाबत **अचुक** आहे/आहेत ?

(a) महाराष्ट्रात पावसाळ्याच्या आरंभी पश्चिमेकडून पूर्वेकडे वायुभार कमी होत जातो.

(b) राज्यातील पर्जन्याचे वितरण प्रामुख्याने नैसर्गिक वनस्पतीच्या वितरणावर अवलंबून असल्याचे आढळते.

(c) नैऋत्य मोसमी वारे घाट माथ्यावरून पूर्वेकडे जातात तेंव्हा त्यांची बाष्पधारणशक्ती वाढते.

(d) विदर्भामध्ये पश्चिमेकडून पूर्वेकडे पावसाचे प्रमाण वाढत जाते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) (a) आणि (b) (3) (b) आणि (c) (4) (a), (c) आणि (d)

Which of the following statement/s is/are **correct** regarding the rainfall of Maharashtra ?

(a) In Maharashtra, the air pressure decreases from West to East at the beginning of the monsoon season.

(b) The distribution of rainfall in the state depends mainly on the distribution of natural vegetation.

(c) When the South-West monsoon winds move Eastward from the ghats, their vapour holding capacity increases.

(d) Rainfall increases from West to East in Vidarbha.

**Answer Options :**

(1) Only (a) (2) (a) and (b) (3) (b) and (c) (4) (a), (c) and (d)

---

17. खालीलपैकी कोणते विधान/ने **चुकीचे/ची** आहे/आहेत ?

(a) कामठी कोळसा क्षेत्र आंब नदीच्या खोऱ्यात आहे.

(b) वर्धा खोऱ्यातील कोळसा क्षेत्र चंद्रपुर व यवतमाळ जिल्ह्यात विभागले आहे.

(c) उमरेड कोळसा क्षेत्र कन्हान नदीच्या खोऱ्यात आहे.

(d) महाराष्ट्रातील तुर्भे या ठिकाणी कॅनडाच्या सहाय्याने अप्सरा आणि ब्रिटनच्या सहाय्याने सायरस या अणुभट्ट्या उभारण्यात आलेल्या आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) (2) फक्त (a) आणि (b)

(3) (a), (c) आणि (d) (4) (a), (b) आणि (d)

Which of the following statement/s is/are **false** ?

(a) The Kamathi coal field is located in the Amb river valley.

(b) The coal field in Vardha valley is divided into Chandrapur and Yavatmal districts.

(c) The Umred coal field is located in the Kanhan river valley.

(d) The Apsara reactor with the assistance of Canada and the Cyrus reactor with the assistance of Britain have been built in Turbhe in Maharashtra.

**Answer Options :**

(1) Only (b) (2) Only (a) and (b)

(3) (a), (c) and (d) (4) (a), (b) and (d)

---

18. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचे खालीलपैकी कोणते उद्देश्य आहेत ?

(a) भूमी उपयोजन आणि उत्पादनात पर्याप्त वाढ करणे.

(b) वाहत्या पाण्याला नियंत्रित करून भूमीचे क्षरण थांबवणे.

(c) गुंतवणूक कमी, उत्पादन खर्चात वाढ करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) (a) आणि (b) (3) फक्त (b) (4) (c) आणि (b)

The catchment area development program has which of the following objectives ?

(a) Substantial increase in landuse and production.

(b) Stop land degradation by controlling runoff.

(c) Reducing investment as well as increasing production costs.

**Answer Options :**

(1) Only (a) (2) (a) and (b) (3) Only (b) (4) (c) and (b)

---

19. खालील विधाने पहा.

(a) महात्मा फुले कृषि विद्यापिठाचे डाळिंब तंत्रज्ञान संशोधन केंद्र लखमापूर येथे आहे.

(b) फुले यशोदा गव्हाचे वाण महात्मा फुले कृषि विद्यापिठाने 1998 मधे विकसित केले.

(c) महाराष्ट्र कृषि विद्यापिठाचे कार्यालय मुंबई येथे होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (a) आणि (b) बरोबर आहेत.

(2) विधान (a) आणि (c) बरोबर आहेत.

(3) विधान (b) आणि (c) बरोबर आहेत.

(4) विधान (a), (b) आणि (c) बरोबर आहेत.

Observe the following statements.

(a) The Pomegranate technology research centre of Mahatma Phule Agricultural University is at Lakhmapur.

(b) Phule Yashoda wheat variety is developed by Mahatma Phule Agricultural University in 1998.

(c) The office of Maharashtra Agricultural University was at Mumbai.

**Answer Options :**

(1) Statement (a) and (b) are correct.

(2) Statement (a) and (c) are correct.

(3) Statement (b) and (c) are correct.

(4) Statement (a), (b) and (c) are correct.

---

20. खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(a) वैतरणा आणि तानसा उल्हास नदीच्या उपनद्या आहेत.

(b) खानापूर पठाराच्या दक्षिणेला कृष्णा नदीचे खोरे आहे.

(c) मन्याड नदी खोरे गोदावरी नदी खोऱ्यात आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त विधान (a)

(2) विधान (a) आणि (b)

(3) विधान (a), (b) आणि (c)

(4) विधान (b) आणि (c)

Which of the following statements are **true** ?

(a) Vaitarna and Tansa are the tributaries of river Ulhas.

(b) Krishna river basin is to the South of Khanapur plateau.

(c) Manyad river basin is in Godavari river basin.

**Answer Options :**

(1) Only Statement (a)

(2) Statements (a) and (b)

(3) Statements (a), (b) and (c)

(4) Statements (b) and (c)

---

21. पुढील विधाने विचारात घ्या :

(a) अटल इनोव्हेशन मिशन (AIM) हा केंद्र शासनाचा पुढाकार आहे.

(b) AIM ही नवनिर्माण आणि उद्योजकता परिसंस्था उभारण्यास कारणीभूत आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त बरोबर आहे.
(2) (b) फक्त बरोबर आहे.
(3) (a) आणि (b) दोन्ही बरोबर आहेत.
(4) (a) आणि (b) दोन्ही चूक आहेत.

Consider these statements :

(a) The Atal Innovation Mission (AIM) is an initiative of the Central government.

(b) AIM is instrumental in establishing ecosystem of innovation and entrepreneurship.

**Answer Options :**

(1) (a) only is correct.
(2) (b) only is correct.
(3) Both (a) and (b) are correct.
(4) Both (a) and (b) are incorrect.

---

22. भारतीय आर्थिक सर्वेक्षण/पाहणी अहवाल 2022-23 अनुसार मेक इन इंडिया 2.0 अंतर्गत खालीलपैकी कोणत्या उप-क्षेत्रांचा समावेश आहे ?

(a) पोलाद
(b) व्यायामशाळा उपकरणे
(c) खेळणी
(d) मत्स्यपालन

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) आणि (b)
(2) केवळ (b) आणि (c)
(3) केवळ (a), (b) आणि (c)
(4) वरीलपैकी सर्व

According to Economic Survey of India 2022-23, which of the following are sub-sectors included under Make in India 2.0 ?

(a) Steel
(b) Gym-equipment
(c) Toys
(d) Fisheries

**Answer Options :**

(1) Only (a) and (b)
(2) Only (b) and (c)
(3) Only (a), (b) and (c)
(4) All of the above

---

23. केंद्रशासन मान्यताप्राप्त स्टार्टअपमध्ये अखिल भारतीय स्तरावर मार्च 2024 पर्यंत महाराष्ट्र राज्याचा हिस्सा __________ आहे.

(1) 19% (2) 23% (3) 22% (4) 17%

As of March 2024, the Maharashtra state has the __________ share in startups recognised by Government of India at All India Level.

(1) 19% (2) 23% (3) 22% (4) 17%

---

**24.** 19 जुलै, 1969 रोजी किती खाजगी व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले ?

(1) 8 (2) 12 (3) 19 (4) 14

How many private commercial banks were nationalised on 19th July, 1969 ?

(1) 8 (2) 12 (3) 19 (4) 14

---

**25.** योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | बँकिंग नियंत्रण कायदा | (i) | सामाजिक उद्देश |
| (b) | बँक राष्ट्रीयीकरण | (ii) | बारा (12) |
| (c) | 31 मार्च 2025 रोजी भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँका | (iii) | मध्यवर्ती बँकेचे नियमनाचे अधिकार |
| (d) | शाखा विस्तार | (iv) | ठेवींचे अधिक संकलन |

योग्य **उत्तर** निवडा :

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (ii) | (iv) | (iii) | (i) |

Match the following.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Banking Regulation Act | (i) | Social purpose |
| (b) | Bank nationalization | (ii) | Twelve |
| (c) | Banks in public sector in India as on 31 March 2025 | (iii) | Regulating powers of central bank |
| (d) | Branch expansion | (iv) | More deposit mobilisation |

Select the **correct** options :

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (4) | (ii) | (iv) | (iii) | (i) |

---

26. खालील विधाने विचारात घ्या :

(a) 2021-22 मध्ये भारताचे अन्नधान्य उत्पादन 315.7 दशलक्ष टन विक्रमी पातळीवर पोहचले.

(b) भारताची ज्वारी वगळता तृणधान्याची उत्पादकता इथिओपियापेक्षा जास्त होती.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **योग्य** आहे/त ?

(1) दोन्ही (a) आणि (b) योग्य आहेत. (2) केवळ (b) योग्य आहे.

(3) केवळ (a) योग्य आहे. (4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही.

Consider the following statements :

(a) India's Foodgrains production touched a record 315.7 million tonnes in 2021-22.

(b) India's productivity of millets excluding jowar was higher than Ethiopia.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) Both (a) and (b) are correct. (2) Only (b) is correct.

(3) Only (a) is correct. (4) None of the above are correct.

---

27. जोड्या जुळवा.

| | **A** <br> **कलम क्र.** | | **B** <br> **तरतूद** |
|---|---|---|---|
| (a) | 112 | (i) | वार्षिक वित्तीय माहिती/विवरण |
| (b) | 151 | (ii) | लेखा अहवाल |
| (c) | 267 | (iii) | आकस्मिकता निधी |
| (d) | 280 | (iv) | वित्त आयोग |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

Match the column.

| | **A** <br> **Article No.** | | **B** <br> **Provision** |
|---|---|---|---|
| (a) | 112 | (i) | Annual Financial statement |
| (b) | 151 | (ii) | Audit Reports |
| (c) | 267 | (iii) | Contingency fund |
| (d) | 280 | (iv) | Finance Commission |

**Answer Options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

---

28. भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे, आर्थिक समावेशन कळफलक (डॅशबोर्ड) 'अंतर्दृष्टी' __________ मध्ये सुरू करण्यात आला.

(1) जून 2021 (2) जून 2022 (3) जून 2023 (4) जून 2024

The Financial Inclusion Dashboard 'ANTARDRISHTI' was launched in __________ by the Reserve Bank of India.

(1) June 2021 (2) June 2022 (3) June 2023 (4) June 2024

---

29. राजकोषीय तूट म्हणजे :

(a) सरकारी कर्जे वगळता सरकारच्या एकूण खर्च आणि एकूण प्राप्तीतील फरक.

(b) भांडवली खर्च व महसूली उत्पन्न यातील फरक.

(c) महसूली खर्च व महसूली उत्पन्न यातील फरक.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त (2) (b) फक्त (3) (c) फक्त (4) यापैकी नाही

Fiscal Deficit is :

(a) Difference between government's total expenditure and total receipts excluding borrowings.

(b) Difference between capital expenditure and revenue receipts.

(c) Difference between revenue expenditure and revenue receipts.

**Answer Options :**

(1) (a) only (2) (b) only (3) (c) only (4) None of these

---

30. खालीलपैकी कोणती भारतीय रिजर्व बँकेच्या मौद्रिक धोरणाची संख्यात्मक साधने आहेत ?

(a) विशिष्ट प्रकारच्या अग्रिमांवर भेदभावपूर्ण व्याज आकारले जाते.

(b) रेपो दर

(c) पत अधिकृतता योजना

(d) खुल्या बाजारातील खरेदी-विक्री

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (a) आणि (c)

(3) फक्त (b) आणि (d) (4) वरीलपैकी सर्व

Which of the following are quantitative weapons of Monetary Policy of the RBI ?

(a) Discriminatory rate of interest charged on certain types of advances.

(b) Repo rate

(c) Credit Authorisation scheme

(d) Open Market operations

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (a) and (c)

(3) Only (b) and (d) (4) All of the above

---

31. खालीलपैकी कोणते/ती लेखापालनाची तत्व/त्वे आहेत ?

(a) जमा/उपार्जित तत्व (b) भौतिकतेचे तत्व

(c) आर्थिक घटक तत्व (d) मौद्रिक एकक तत्व

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (c) आणि (d)

(3) फक्त (a), (b) आणि (d) (4) वरील सर्व

Which of the following is/are the Principles of Accounting ?

(a) Accrual Principle (b) Materiality Principle

(c) Economic Entity Principle (d) Monetary Unit Principle

**Answer Options :**

(1) Only (a) and (b) (2) Only (c) and (d)

(3) Only (a), (b) and (d) (4) All of the above

---

32. छापील पैशांचा वापर करून सरकार जेंव्हा आपल्या अंदाजपत्रकातील तूट भरून काढते, त्यामुळे __________ वाढू शकते.

(1) महामंदी (2) घसरण (मंदी) (3) चलनवाढ (4) वरीलपैकी कोणतेही नाही

When government finances its budget deficit by using printed money, it can lead to __________.

(1) Depression (2) Recession (3) Inflation (4) None of the above

---

33. खालीलपैकी कोणते/कोणती वैशिष्ट्ये 'करदेय क्षमता तत्वाची' आहेत ?

(a) उच्च उत्पन्न मिळवणारे आणि श्रीमंत व्यक्तींनी अधिक आयकर भरावा.

(b) कमी उत्पन्न मिळवणारे आणि गरीब लोकांना आयकरातून सूट देण्यात येते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (b) दोन्ही (4) यापैकी कोणतेही नाही

Which of the following is/are characteristics of 'Ability to pay Principle' ?

(a) High income earners and wealthier individuals should pay more income tax.

(b) Low income earners and poor peoples are exempted from paying income tax.

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (a) and (b) (4) None of these

---

34. भारताच्या 16 व्या वित्तं आयोगाचे अध्यक्ष कोण आहेत ?

(1) डॉ. अरविंद पनगारिया (2) डॉ. सी.आर. रंगराजन

(3) बी.के. चौधरी (4) डॉ. विजय केळकर

Who is the Chairman of the 16th Finance Commission ?

(1) Dr. Arvind Pangaria (2) Dr. C.R. Rangrajan

(3) B.K. Choudhary (4) Dr. Vijay Kelkar

35. खालील विधाने विचारात घ्या :

(a) भारतीय रिजर्व बँकेने (आरबीआय) डिसेंबर 1997 मध्ये कृषि कर्जावरील उच्चस्तरीय समितीची स्थापना केली.

(b) श्री. आर.व्ही. गुप्ता हे कृषि कर्जविषयक उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष होते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **योग्य** आहे/त ?

(1) फक्त (a) योग्य आहे.
(2) फक्त (b) योग्य आहे.
(3) दोन्ही (a) आणि (b) योग्य आहेत.
(4) वरीलपैकी कोणतेही योग्य नाही.

Consider the following statements :

(a) The Reserve Bank of India (RBI) set up a high level committee on agricultural credit in December 1997.

(b) Mr. R.V. Gupta was Chairman of a high level committee on agricultural credit.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) Only (a) is correct.
(2) Only (b) is correct.
(3) Both (a) and (b) are correct.
(4) None of the above are correct.

---

36. 2024-25 च्या आर्थिक वर्षात __________ सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) वाढीसह भारताचा विकास मजबूत राहील आणि वाढीच्या मार्गावर सुरू राहण्याचा अंदाज आहे.

(1) 7.5%
(2) 8.5%
(3) 6.5%
(4) 7.2%

India's growth remain robust with __________ GDP growth in financial year 2024-25, and is projected to continue on the growth path.

(1) 7.5%
(2) 8.5%
(3) 6.5%
(4) 7.2%

---

37. __________ आणि __________ च्या सह-अध्यक्षतेखाली पॅरिस AI ॲक्शन शिखर परिषद 2025 ने, AI च्या जगातील एक महत्त्वाचा क्षण आहे, ज्यामध्ये डिजिटल विभाजनापासून AI सुरक्षेपर्यंतच्या गंभीर आव्हानांना तोंड देण्यासाठी 90 हून अधिक राष्ट्रांना एकत्र आणले आहे.

(1) भारत व फ्रान्स
(2) फ्रान्स व चीन
(3) चीन व जर्मनी
(4) फ्रान्स व युएस

The Paris AI Action Summit, 2025 co-chaired by __________ and __________ , marks a pivotal moment in the world of AI, bringing together over 90 nations to address critical challenges from digital divide to AI safety.

(1) India and France
(2) France and China
(3) China and Germany
(4) France and US

---

38. 2030 सालापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असलेले जगातील सर्वात मोठे जलविद्युत धरण चीन कोठे बांधत आहे ?

(1) यारलुंग झांगबो (ब्रम्हपुत्रा) नदी, तिबेट
(2) यांगत्से नदी, सिचुआन प्रांत
(3) यलो नदी (पिवळी नदी), शांक्सी प्रांत
(4) मिकाँग नदी, युनान प्रांत

Where is China constructing the world's largest hydro-power dam, which is expected to be completed by the year 2030 ?

(1) Yarlung Zangbo (Brahmaputra) river in Tibet
(2) Yangtze river in Sichuan province
(3) Yellow river in Shanxi province
(4) Mekong river in Yunnan province

---

39. जोड्या लावा : (द्रोणाचार्य पुरस्कार, 2024)

| | **'A' ( प्रशिक्षक )** | | **'B' ( क्रीडा प्रकार )** |
|---|---|---|---|
| (a) | सुभाष राणा | (i) | नेमबाजी |
| (b) | दीपाली देशपांडे | (ii) | पॅरा-नेमबाजी |
| (c) | संदीप संगवान | (iii) | हॉकी |
| (d) | एस. मुरलीधरण | (iv) | बॅडमिंटन |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

Match the pairs : (Dronacharya Award, 2024)

| | **'A' (Coach)** | | **'B' (Sport Discipline)** |
|---|---|---|---|
| (a) | Subhash Rana | (i) | Shooting |
| (b) | Deepali Deshpande | (ii) | Para-shooting |
| (c) | Sandeep Sangwan | (iii) | Hockey |
| (d) | S. Muralidharan | (iv) | Badminton |

**Answer Options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

---

40. भारतातील बहुउद्देशीय ग्रीन हायड्रोजन पायलट प्रकल्पाचे उद्घाटन सतलज जल विद्युत निगम (SJVN) ने __________ मधील झाक्री येथील त्यांच्या जलविद्युत केंद्रांमध्ये एप्रिल 2024 मध्ये केले.

(1) पंजाब (2) हरियाणा
(3) हिमाचल प्रदेश (4) उत्तराखंड

India's Multipurpose Green Hydrogen Pilot Project was inaugurated by Satlaj Jal Vidyut Nigam (SJVN) at its Hydro Power Station in Jhakri, __________ in April 2024.

(1) Punjab (2) Haryana
(3) Himachal Pradesh (4) Uttarakhand

---

41. फेब्रुवारी 2025 मध्ये खालीलपैकी कोणत्या कंपनीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून दोराबाबू दपर्ती यांची नियुक्ती करण्यात आली आहे?

(1) कोटक लाईफ इन्शुरन्स कंपनी
(2) आय सी आय सी आय प्रुडेन्शीयल लाईफ इन्शुरन्स कंपनी
(3) एस बी आय लाईफ इन्शुरन्स कंपनी
(4) एच डी एफ सी लाईफ इन्शुरन्स कंपनी

Dorababu Daparti has been appointed as the Deputy Chief Executive Officer of which of the following companies in February 2025 ?

(1) Kotak Life Insurance Company
(2) ICICI Prudential Life Insurance Company
(3) SBI Life Insurance Company
(4) HDFC Life Insurance Company

---

42. मे 2025 मध्ये ऑडी इंडीयाचा ब्रँड अँबेसॅडर कोण बनला?

(1) नीरज चोप्रा (2) एम.एस. धोनी (3) ऋतिक रोशन (4) रणवीर सिंग

Who became the Brand Ambassador for Audi India in May 2025 ?

(1) Neeraj Chopra (2) M.S. Dhoni (3) Hrithik Roshan (4) Ranveer Singh

---

43. एअर न्युझिलँडने जुलै 2025 मध्ये __________ यांची त्यांचे पुढील मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे.

(1) अरविंद कृष्णा (2) अरविंद श्रीनिवास
(3) संजय मेहरोत्रा (4) निखिल रविशंकर

Air New Zealand has announced __________ as their next CEO in July 2025.

(1) Arvind Krishna (2) Arvind Shrinivas
(3) Sanjay Mehrotra (4) Nikhil Ravishankar

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**44.** खालीलपैकी **योग्य** कथन/ने ओळखा :
(a) दरवर्षी 09 सप्टेंबर रोजी साजरा केला जाणारा 'जागतिक संगीत दिन' जगभरात मोफत सार्वजनिक संगीत सादरीकरणाला प्रोत्साहन देतो.
(b) जागतिक संगीत दिन, 2025 ची थीम ही "हिलींग थ्रु हार्मनी" आहे.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) व (b) दोन्ही (4) वरीलपैकी एकही नाही

Select the **correct** statement/s from the following :
(a) 'World Music Day' celebrated annually on September 09, encourages free public musical performances worldwide.
(b) The World Music Day, 2025 has a theme "Healing through Harmony".
**Answer Options :**
(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (a) and (b) (4) None of the above

---

**45.** ऑगस्ट 2025 मध्ये खालीलपैकी कोणाची आंतरराष्ट्रीय नाणे निधी (आय.एम.एफ.) मध्ये कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती झाली आहे?
(1) उर्जित पटेल (2) रघुराम राजन (3) शक्तिकांता दास (4) संजय मल्होत्रा

Who among the following has been appointed in August 2025 as executive director at the International Monetary Fund (IMF) ?
(1) Urjit Patel (2) Raghuram Rajan (3) Shaktikanta Das (4) Sanjay Malhotra

---

**46.** जोड्या लावा : (साहित्य अकादमी युवा पुरस्कार, 2025)

| | 'A' (ग्रंथ/काव्य) | | 'B' (लेखक/कवी) |
|---|---|---|---|
| (a) | गर्ल्स होस्टेल | (i) | पार्वती तिरके |
| (b) | फिर उगना | (ii) | मनदिप औलाख |
| (c) | अंग असुर | (iii) | अद्वैत कोठारे |
| (d) | सिद्धार्थ – द बॉय व्हु बिकेम द बुद्ध | (iv) | अमर कुंगर बोरो |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (i) | (iv) | (iii) |

Match the pairs : (Sahitya Akademi Yuva Puruskar, 2025)

| | 'A' (Book/Poetry) | | 'B' (Writer/Poet) |
|---|---|---|---|
| (a) | Girls Hostel | (i) | Parvati Tirkey |
| (b) | Phir Ugna | (ii) | Mandeep Aulakh |
| (c) | Ang Asur | (iii) | Advait Kottary |
| (d) | Siddhartha - The boy who became the Buddha | (iv) | Amar Kungur Boro |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (i) | (iv) | (iii) |

47. खालीलपैकी कोणी 2025 च्या एफ आय एस एम वर्ल्ड चँपीयनशिप ऑफ मॅजिक मध्ये प्रतिष्ठित 'बेस्ट मॅजिक क्रिएटर' पुरस्कार जिंकला ?

(1) आँचल कुमावत (2) कविता अग्रवाल (3) सुहानी शाह (4) साक्षी शाह

Which of the following won the Prestigious 'Best Magic Creator' Award at the 2025 FISM World Championship of Magic ?

(1) Anchal Kumavat (2) Kavita Agrawal (3) Suhani Shah (4) Sakshi Shah

---

48. खालीलपैकी **योग्य** कथन/ने ओळखा :

(a) वाराणसी येथे जुलै 2025 मध्ये 'युवा आध्यात्मिक शिखर परिषद 2025' आयोजित करण्यात आली होती.

(b) 'युवा आध्यात्मिक शिखर परिषद 2025' ची थीम, ''जागेगा युवा, बढेगा युवा'' ही होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) व (b) दोन्ही (4) वरीलपैकी एकही नाही

Select the **correct** statement/s from the following :

(a) 'The Youth Spiritual Summit 2025' was held in July 2025 at Varanasi.

(b) The theme of 'Youth Spiritual Summit 2025' was "Jagega Yuva, Badhega Yuva".

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (a) and (b) (4) None of the above

---

49. सप्टेंबर 2024 मध्ये खालीलपैकी कोणी नवी दिल्ली येथे कॉम्प्युटर सेक्युरीटी इन्सीडन्ट रीस्पॉन्स टिम (सी.एस.आय.आर.टी.)-पॉवर सुविधेचे उद्घाटन केले आहे ?

(1) श्री. एच.डी. कुमारस्वामी (2) श्री. पियुष गोयल

(3) श्री. मनोहरलाल (4) डॉ. विरेंद्र कुमार

Who among the following has inaugurated Computer Security Incident Response Team (CSIRT)-Power Facility in New Delhi in September 2024 ?

(1) Shri. H.D. Kumaraswamy (2) Shri. Piyush Goyal

(3) Shri. Manoharlal (4) Dr. Virendra Kumar

---

50. खाली दिलेल्या विधानांपैकी पहलगाम संबंधी **योग्य** विधाने निवडा.

(a) पहलगाम अनंतनाग जिल्ह्यात स्थित आहे.

(b) पहलगाम मध्ये लिडर नाला पर्यटकांना आकर्षित करतो.

(c) श्री माता वैष्णोदेवी मार्गावरील पहलगाम हा एक महत्त्वाचा ट्रान्झिट कॅम्प आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) (2) (a), (b) (3) (a), (c) (4) (b), (c)

Find the **correct** statements about Pahalgam from the sentences given below.

(a) Pahalgam is situated in the District of Anantnag.

(b) Lidder Nallah attracts tourists in Pahalgam.

(c) It is an important transit camp on the way to Shri Mata Vaishno Devi.

**Answer Options :**

(1) (a), (b), (c) (2) (a), (b) (3) (a), (c) (4) (b), (c)

---

51. भारतीय संविधानातील कलम 243-G बाबतीत खालीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत ?
(a) सभासदत्वाची अपात्रता
(b) पंचायतीची सत्ता, अधिकार आणि जबाबदाऱ्या
(c) पंचायतीची रचना
(d) पंचायतीचा कालावधी
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (c) (4) (c) आणि (d)

Which of the following about Article 243-G in the Constitution of India is/are **correct** ?
(a) Disqualification of membership
(b) Powers, authority and responsibilities of Panchayats
(c) Composition of Panchayats
(d) Duration of Panchayats
**Answer Options :**
(1) Only (a) (2) Only (b) (3) (a) and (c) (4) (c) and (d)

---

52. खालीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत ?
(a) 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेसह महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता कार्यालय अस्तित्वात आले.
(b) महाधिवक्त्याची नियुक्ती भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 165 मधील तरतुदीनुसार केली जाईल.
(c) बिरेंद्र सराफ हे महाराष्ट्राचे महाधिवक्ता आहेत. (ऑगस्ट 2025)
**पर्यायी उत्तरे :**
(1) (a) आणि (c) (2) (b) आणि (c) (3) (a) आणि (b) (4) (a), (b) आणि (c)

Which of the following statement/statements is/are **correct** ?
(a) The office of the Advocate General for the State of Maharashtra came into existence with the formation of the State itself on May 1, 1960.
(b) The Advocate General shall be appointed in accordance with the provisions of Article 165 of the Constitution of India.
(c) Birendra Saraf is the Advocate General of Maharashtra. (as of August 2025)
**Answer Options :**
(1) (a) and (c) (2) (b) and (c) (3) (a) and (b) (4) (a), (b) and (c)

---

53. खालीलपैकी कोणते मूलभूत कर्तव्य **नाही** ?
(1) वैयक्तिक आणि सामूहिक क्रियाकलापांच्या सर्व क्षेत्रात उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे जेणे करून राष्ट्र सतत प्रयत्न आणि यशाच्या उच्च पातळीवर पोहोचेल.
(2) जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने आपल्या पाल्यास त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चौदाव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.
(3) गरीबांना समान न्याय आणि मोफत कायदेशीर मदतीचा प्रचार करणे.
(4) देशाचे रक्षण करणे आणि आवाहन केले असता राष्ट्रीय सेवा करणे.

Which of the following is **not** fundamental duties ?
(1) To strive towards excellence in all spheres of individual and collective activity so that the nation constantly rises to higher levels of endeavour and achievement.
(2) Who is parent or guardian to provide opportunities for education to his child or as the case may be ward between the age of six and fourteen years.
(3) Promote equal justice and free legal aid to the poor.
(4) To defend the country and render national service when called upon to do so.

---

54. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर सप्टेंबर 2025 पर्यंत सर्वाधिक काळ मुख्यमंत्री म्हणून खालीलपैकी कोण राहीलेले आहेत ?

(1) शरद पवार (2) देवेंद्र फडणवीस

(3) वसंतदादा पाटील (4) वसंतराव नाईक

Who among the following has served as the Chief Minister of Maharashtra for the longest period till September 2025 ?

(1) Sharad Pawar (2) Devendra Fadnavis

(3) Vasant Dada Patil (4) Vasantrao Naik

---

55. खालीलपैकी कलम-349 मध्ये काय नमूद करण्यात आले आहे ?

(1) भाषेशी संबंधित काही कायदे लागू करण्यासाठीची विशेष प्रक्रिया

(2) सर्वोच्च न्यायालयात आणि उच्च न्यायालयांमध्ये आणि कायदे, विधेयके इत्यादींसाठी वापरण्याची भाषा

(3) प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षणाच्या सुविधा

(4) हिंदी भाषेच्या विकासासाठी निर्देश

Which of the following is mentioned in Article-349 ?

(1) Special procedure for the implementation of certain laws relating to language.

(2) Language to be used in the Supreme Court and High Courts and for laws, bills etc.

(3) Facilities for education in mother tongue at the primary level.

(4) Directions for the development of Hindi language.

---

56. जोड्या जुळवा.

| यादी-I (भारतीय संविधानातील बाब) | | यादी-II (ज्या देशाकडून घेण्यात आले आहे) | |
|---|---|---|---|
| (a) | राज्य धोरणाची निर्देशक तत्वे | (i) | ऑस्ट्रेलिया |
| (b) | मूलभूत हक्क | (ii) | कॅनडा |
| (c) | संघराज्य संबंधामध्ये समवर्ती यादी | (iii) | आयर्लंड |
| (d) | भारत हा मोठ्या राज्यांचा संघ म्हणून संघराज्याचे अधिकार | (iv) | यूके |
| | | (v) | यूएसए |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (v) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (v) | (ii) | (i) |
| (3) | (v) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (v) | (i) | (ii) |

Match :

| List-I (Item in the Indian Constitution) | | List-II (Country from which it is derived) | |
|---|---|---|---|
| (a) | Directive Principles of State Policy | (i) | Australia |
| (b) | Fundamental Rights | (ii) | Canada |
| (c) | Concurrent list in Union State relations | (iii) | Ireland |
| (d) | India as a Union of States with greater powers to union | (iv) | UK |
| | | (v) | USA |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (v) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (v) | (ii) | (i) |
| (3) | (v) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (v) | (i) | (ii) |

57. भारतीय संविधानाच्या कलम-8 मध्ये खालीलपैकी कशाचा उल्लेख आहे?
(1) पाकिस्तानातून भारतात स्थलांतरित झालेल्या काही विशिष्ट व्यक्तिंचे नागरिकत्वाचे अधिकार.
(2) भारताबाहेर राहणाऱ्या भारतीय वंशाच्या काही विशिष्ट व्यक्तिंचे नागरिकत्वाचे अधिकार.
(3) पाकिस्तानात स्थलांतरित झालेल्या काही विशिष्ट व्यक्तिंचे नागरिकत्वाचे अधिकार.
(4) संसद कायद्याद्वारे नागरिकत्वाच्या अधिकाराचे नियमन करेल.

Which of the following is mentioned in Article-8 of the Indian Constitution ?
(1) Rights of Citizenship of certain persons who have migrated to India from Pakistan.
(2) Rights of Citizenship of certain persons of Indian origin residing outside India.
(3) Rights of Citizenship of certain persons migrated to Pakistan.
(4) Parliament to regulate the right of Citizenship by Law.

58. उप-राष्ट्रपतींच्या पात्रतेबाबत **अयोग्य** कथन/ने ओळखा.

(a) भारताचा नागरिक असावा.

(b) पंचेचाळीस वर्षे पूर्ण असावी.

(c) लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास अर्हताप्राप्त असल्याखेरीज उपराष्ट्रपती पदाच्या निवडणूकीस पात्र असणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b), (c) (2) फक्त (b) (3) फक्त (a), (c) (4) वरीलपैकी सर्व

Select the **incorrect** statement/s about qualification of Vice-President.

(a) is a citizen of India.

(b) has completed the age of forty five years.

(c) is qualified for election as a member of House of People (Lok Sabha).

**Answer Options :**

(1) Only (b), (c) (2) Only (b) (3) Only (a), (c) (4) All of the above

---

59. पंतप्रधानाच्या भूमिकेबाबत **योग्य** कथने ओळखा :

(a) रॅम्से म्यूर – ''पंतप्रधान हे राज्यरुपी जहाजाचे सुकाणू चालक आहेत.''

(b) एच.आर.जी. ग्रीव्हज – ''सरकार हे देशाचे स्वामी आहेत आणि पंतप्रधान हे सरकारचे स्वामी आहेत.''

(c) मुन्रो – ''पंतप्रधान हे ताऱ्यांमधील चंद्र आहेत.''

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a), (b) (2) फक्त (b), (c) (3) फक्त (a), (c) (4) वरीलपैकी सर्व

Select the **correct** statements about Role of Prime Minister :

(a) Ramsay Muir - "Prime Minister is the steersman of steering wheel of the ship of the state."

(b) H.R.G. Greaves - "The Government is the master of the country and Prime Minister is the master of Government."

(c) Munro - "Prime Minister is a moon among lesser stars."

**Answer Options :**

(1) Only (a), (b) (2) Only (b), (c) (3) Only (a), (c) (4) All of the above

---

60. 1950 मध्ये भारतीय संविधानात भारतीय संघराज्यातील प्रदेशांचे चार-स्तरीय वर्गीकरण होते.

(a) भाग ए – कायदेमंडळ असलेली संस्थाने

(b) भाग बी – ब्रिटिश भारतातील राज्यपालांचे प्रांत

(c) भाग सी – ब्रिटिश भारतातील मुख्य कमिशनरांचे प्रांत

(d) भाग डी – अंदमान व निकोबार बेटे

वरीलपैकी **योग्य** जोड्या निवडा :

(1) फक्त (a), (b), (c) (2) फक्त (c), (d)

(3) फक्त (b), (d), (a) (4) वरीलपैकी सर्व

In 1950, the Constitution of India contained a four-fold classification of units of the Indian Union.

(a) Part A - Princely states with legislature

(b) Part B - Governor's provinces of British India

(c) Part C - Chief Commissioner's provinces of British India

(d) Part D - Andaman and Nicobar Islands

Select the **correct** pairs from the above :

(1) Only (a), (b), (c) (2) Only (c), (d)

(3) Only (b), (d), (a) (4) All of the above

---

61. राज्यपालांच्या संदर्भात खालीलपैकी कोणता/ते विधान/ने **चुकीचे** आहे/त ?

(a) कलम 158 नुसार राज्यपाल राष्ट्रपतींच्या मर्जीनुसार पदावर राहतील.

(b) कलम 155 नुसार राज्याच्या राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपती त्यांच्या सही आणि शिक्क्यासह वॉरंटद्वारे करतील.

(c) कलम 154 नुसार राज्याची कार्यकारी शक्ती राज्यपालांकडे असेल आणि ती त्यांच्याकडून थेट किंवा या संविधानानुसार त्यांच्या अधिनस्थ अधिकाऱ्यांद्वारे वापरली जाईल.

(d) कलम 163 नुसार राज्यपालांना मदत करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ असेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (b) आणि (c) (4) (c) आणि (d)

Which of the following statement/statements is/are **false** in concern with the Governor ?

(a) As per Article 158 the Governor shall hold office during the pleasure of the President.

(b) As per Article 155 the Governor of a state shall be appointed by the President by warrant under his hand and seal.

(c) As per Article 154 the executive power of the state shall be vested in the Governor and shall be exercised by him either directly or through officers subordinate to him in accordance with this Constitution.

(d) As per Article 163 there shall be a council of ministers with the Chief Minister at the head to aid and advise the Governor.

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) (b) and (c) (4) (c) and (d)

---

62. खालील जोड्या जुळवा :

| | **यादी-I (विषय)** | | **यादी-II (कलम क्र.)** |
|---|---|---|---|
| (a) | ग्रामसभा | (i) | 243 K |
| (b) | राखीव जागा/आरक्षण तरतूदी | (ii) | 243 F |
| (c) | पंचायतींच्या निवडणूका | (iii) | 243 A |
| (d) | सदस्यांच्या अपात्रतेसंदर्भात | (iv) | 243 D |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

Match the following :

| | **List-I (Subject )** | | **List-II (Article No.)** |
|---|---|---|---|
| (a) | Gram Sabha | (i) | 243 K |
| (b) | Reservation of seats | (ii) | 243 F |
| (c) | Elections to the Panchayats | (iii) | 243 A |
| (d) | Disqualification for membership | (iv) | 243 D |

**Answer Options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

---

63. खालीलपैकी कोणती कथने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 20 शी संबंधित आहेत ?

(a) कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्या खेरीज कोणत्याही व्यक्तिस तिचे जीवित किंवा व्यक्तीगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.

(b) एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा कोणत्याही व्यक्तिवर खटला चालवला जाणार नाही आणि तिला शिक्षा दिली जाणार नाही.

(c) कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तिवर स्वत:विरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती केली जाणार नाही.

(d) राज्य सहा ते चौदा वर्षे वयाच्या सर्व बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a), (b), (c) (2) फक्त (b), (c) (3) फक्त (a), (d) (4) वरीलपैकी सर्व

Which of the following statements are related to Article 20 of the Constitution of India ?

(a) No person shall be deprived of his life or personal liberty except according to procedure established by law.

(b) No person shall be prosecuted and punished for the same offence more than once.

(c) No person accused of any offence shall be compelled to be a witness against himself.

(d) The state shall provide free and compulsory education to all children of the age of six to fourteen years.

**Answer Options :**

(1) Only (a), (b), (c) (2) Only (b), (c) (3) Only (a), (d) (4) All of the above

---

64. खालीलपैकी कोणते विधान/विधाने कलम 168 मध्ये समाविष्ट **नाही/नाहीत** ?

(a) प्रत्येक राज्यासाठी एक कायदेमंडळ असेल ज्यामध्ये राज्यपाल असतील.

(b) जिथे राज्याच्या कायदेमंडळाची दोन सभागृहे असतील तिथे एक विधान परिषद आणि दुसरे विधानसभा म्हणून ओळखले जाईल.

(c) जिथे फक्त एकच सभागृह असेल तेथे ते विधानसभा म्हणून ओळखले जाईल.

(d) प्रत्येक राज्याच्या विधानसभेत राज्यातील प्रादेशिक मतदार संघांमधून थेट निवडणुकीद्वारे निवडलेले पाचशेपेक्षा जास्त आणि साठपेक्षा कमी नसलेले सदस्य असतील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (d) (3) (b) आणि (c) (4) (a) आणि (b)

Which of the following statement/statements is/are **not** included in Article 168 ?

(a) For every state there shall be a legislature which shall consist of the Governor.

(b) Where there are two Houses of the Legislature of a state, one shall be known as the Legislative Council and other as the Legislative Assembly.

(c) Where there is only one house, it shall be known as the Legislative Assembly.

(d) The Legislative Assembly of each state shall consist of not more than five hundred and not less than sixty members chosen by direct election from territorial constituencies in the state.

**Answer Options :**

(1) (a) (2) (d) (3) (b) and (c) (4) (a) and (b)

---

65. भारतीय संविधानाच्या खालीलपैकी कोणत्या कलमात आणि भागात मूलभूत कर्तव्ये समाविष्ट आहेत ?

(1) कलम 51 A, भाग IV A (2) कलम 55 A, भाग III A

(3) कलम 41 A, भाग IV C (4) कलम 46 A, भाग III B

Which of the following articles and parts of the Indian Constitution enumerate fundamental duties ?

(1) Article 51 A, Part IV A (2) Article 55 A, Part III A

(3) Article 41 A, Part IV C (4) Article 46 A, Part III B

66. खालील विधाने बरोबर की चूक ते सांगा :

(a) क्ष-किरण या विद्युत चुंबकीय लहरी आहेत.

(b) क्ष-किरणांची तरंगलांबी खूप कमी असते.

(c) क्ष-किरणांच्या वर ऋण भार असतो.

(d) क्ष-किरण विद्युत आणि चुंबकीय क्षेत्रामुळे विचलित होतात.

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | बरोबर | बरोबर | चूक | चूक |
| (2) | चूक | चूक | बरोबर | चूक |
| (3) | बरोबर | चूक | बरोबर | चूक |
| (4) | बरोबर | बरोबर | बरोबर | चूक |

State whether following statements are true or false :

(a) X-rays are electromagnetic waves.

(b) The wavelength of X-ray is very short.

(c) X-rays are having negative charge.

(d) X-rays are deflected by electric and magnetic fields.

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | True | True | False | False |
| (2) | False | False | True | False |
| (3) | True | False | True | False |
| (4) | True | True | True | False |

67. जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | अल्फा कण | (i) | क्युरी |
| (b) | बिटा कण | (ii) | इलेक्ट्रॉन |
| (c) | किरणोत्साराचे एकक | (iii) | $_2He^4$ –हेलियम अणु |
| (d) | गॅमा किरण | (iv) | उच्च ऊर्जेचे फोटॉन |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

Match the pairs.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Alpha particle | (i) | Curie |
| (b) | Beta particle | (ii) | Electron |
| (c) | Unit of Radioactivity | (iii) | $_2He^4$-Helium atom |
| (d) | Gamma rays | (iv) | Photon of high energy |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

---

68. अप्रकट विलयन उष्मा म्हणजे __________.

(1) पदार्थाच्या एकक वस्तुमानाला उष्णता देण्यासाठी लागणाऱ्या उष्णतेची मात्रा

(2) एकक वस्तुमानाचे तापमान 1°C ने वाढविण्यासाठी लागणाऱ्या उष्णतेची मात्रा

(3) पदार्थाच्या एकक वस्तुमानाला त्याच्या विलयन बिंदूवर तापमान वाढविण्यासाठी घन स्थितीतून द्रव स्थितीत रूपांतरित करण्यासाठी लागणाऱ्या उष्णतेची मात्रा

(4) वरीलपैकी काहीही नाही

Latent heat of fusion is defined as __________.

(1) the amount of heat required to heat unit mass of the substance.

(2) the amount of heat required to raise the temperature of a unit mass through 1°C.

(3) the amount of heat required to convert unit mass of the substance from solid to liquid at its melting point without rise of temperature.

(4) None of the above

---

69. पृथ्वीच्या वातावरणाचे थर जे जमिनीपासून वरच्या दिशेने क्रमाने आहेत. त्यांचा खालीलपैकी कोणता क्रम **बरोबर** आहे ?

(1) स्थितांबर → मध्यंबर → उष्णांबर → तपांबर

(2) मध्यंबर → उष्णांबर → तपांबर → स्थितांबर

(3) उष्णांबर → तपांबर → स्थितांबर → मध्यंबर

(4) तपांबर → स्थितांबर → मध्यंबर → उष्णांबर

Which of the following is **correct** order of atmospheric layers from ground to upwards ?

(1) Stratosphere → Mesosphere → Thermosphere → Troposphere

(2) Mesosphere → Thermosphere → Troposphere → Stratosphere

(3) Thermosphere → Troposphere → Stratosphere → Mesosphere

(4) Troposphere → Stratosphere → Mesosphere → Thermosphere

---

70. ॲल्युमिनियमचे प्रमुख खनिज कोणते ?

(1) बॉक्साइट (2) मॅलाकाइट (3) गॅलिना (4) डोलामाइट

Which is the Principle ore of Aluminium ?

(1) Bauxite (2) Malachite (3) Galina (4) Dolamite

---

71. कार्बनच्या सर्वाधिक मुबलक समस्थानिकेची अणूवस्तूमान संख्या किती आहे ?

(1) 6 (2) 14 (3) 13 (4) 12

What is the atomic mass number of most abundant isotope of carbon ?

(1) 6 (2) 14 (3) 13 (4) 12

---

72. डेन्टॉलीयम हा प्राणी कोणत्या संघामध्ये मोडतो ?

(1) मॉलुस्का (2) ॲनेलिडा (3) आर्थ्रोपोडा (4) इकायनोडरमॅटा

The Dentalium belongs Phylum :

(1) Mollusca (2) Annelida (3) Arthropoda (4) Echinodermata

---

73. कॅटफिशच्या अनेक प्रजातींमध्ये मिश्यांसारख्या प्रक्षेपणांवर रुचिज्ञान कलिका असतात ज्या अन्न शोधण्यास मदत करतात. त्या प्रक्षेपणांना __________ म्हणतात.

(1) इंटरडिजिटेटिंग फॅरेंजियल दात (2) बार्बेल

(3) मोलारिफॉर्म दात (4) कॅनिनिफॉर्म दात

Many species of catfish have taste buds on whisker like projections, which help in finding food are called as :

(1) Interdigitating pharyngeal teeth (2) Barbels

(3) Molariform teeth (4) Caniniform teeth

---

74. खालीलपैकी कोणता प्राणी सर्वात आदिम पृष्ठवंशी प्राण्यांच्या गट अग्नाथाशी संबंधित आहे?

(1) स्कॉलीओडॉन (डॉगफिश) (2) रॅटस रॅटस (काळा उंदीर)

(3) पेट्रोमाझॉन (लैम्प्रे) (4) लोरीस

Which of the following animal belongs to the group Agnatha, the most primitive vertebrates ?

(1) Scoliodon (Dog fish) (2) Rattus rattus (Black rat)

(3) Petromyzon (Lamprey) (4) Loris

---

75. वनस्पती गटाचे **योग्य** उदाहरण जोडी जुळवा.

| | **वनस्पती गट** | | **उदाहरण** |
|---|---|---|---|
| (a) | शैवाळ | (i) | सायकस |
| (b) | ब्रायोफायटा | (ii) | लायकोपोडियम |
| (c) | टेरिडोफायटा | (iii) | फ्युनारिया |
| (d) | जिम्नोस्पर्म | (iv) | क्लायमॅडोमोनास |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

Match the **correct** example of the Plant group.

| | **Plant Group** | | **Example** |
|---|---|---|---|
| (a) | Algae | (i) | Cycas |
| (b) | Bryophyte | (ii) | Lycopodium |
| (c) | Pteridophyte | (iii) | Funaria |
| (d) | Gymnosperm | (iv) | Chlamydomonas |

**Answer Options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

---

76. संपूर्ण झाडाची वाढ खुंटणे, पानाचा गडद हिरवा रंग ज्यात विकृत आणि मृत ऊतिंचे लहान भाग असतात हे फॉस्फरसच्या कमतरतेचे कोणते लक्षण आहे ?

(1) क्लोरोसीस (2) विल्टींग (3) नेक्रोटिक स्पॉट्स (4) लिफ कर्लिंग

What symptoms of phosphorus deficiency is characterised by stunted growth of the entire plant, dark green colouration at the leaves which may be malformed and contains small areas of dead tissues is called as ?

(1) Chlorosis (2) Wilting (3) Necrotic spots (4) Leaf curling

---

77. वनस्पतींना कॅल्शियम चयापचयासाठी कोणत्या खनिजाची आवश्यकता असते ?

(1) मँगनीज (2) तांबे (3) झिंक (4) बोरॉन

Which mineral plays important role in calcium metabolism of plants ?

(1) Manganese (2) Copper (3) Zinc (4) Boron

---

78. ________ या जीवनसत्वामुळे रक्त साकळण्यास/गोठण्यास मदत होते.

(1) के (2) ई (3) डी (4) सी

________ vitamin helps in blood clotting.

(1) K (2) E (3) D (4) C

---

79. ABO रक्तगटाचा शोध ________ यांनी लावला.

(1) विल्यम हार्वे (2) डिकास्टेलो (3) स्टर्ली (4) कार्ल लँडस्टेनर

ABO blood group was discovered by ________.

(1) William Harvey (2) Di-castello (3) Sturli (4) Karl Landsteiner

---

80. जागतिक मधुमेह दिन ________ या दिवशी साजरा केला जातो.

(1) 14 जून (2) 29 सप्टेंबर (3) 7 एप्रिल (4) 14 नोव्हेंबर

World Diabetes Day is celebrated on ________.

(1) 14 June (2) 29 September (3) 7 April (4) 14 November

---

81. खाली दिलेल्या शृंखलेत पहिल्या 15 पदांची बेरीज किती आहे?

$\frac{1}{2\times3}+\frac{1}{3\times4}+\frac{1}{4\times5}+.........$

(1) $\frac{15}{34}$ (2) $\frac{14}{17}$ (3) $\frac{34}{15}$ (4) $\frac{17}{14}$

The sum of the first 15 terms of the series $\frac{1}{2\times3}+\frac{1}{3\times4}+\frac{1}{4\times5}+.........$ is :

(1) $\frac{15}{34}$ (2) $\frac{14}{17}$ (3) $\frac{34}{15}$ (4) $\frac{17}{14}$

---

82. सहा सलग सम संख्यांची A, B, C, D, E, F बेरीज 150 आहे. तर त्यापुढील 3 सलग सम संख्यांची बेरीज किती असेल?

(1) 90 (2) 100 (3) 102 (4) 80

The sum of six consecutive even numbers A, B, C, D, E, F is 150. What is the sum of the next three consecutive even numbers ?

(1) 90 (2) 100 (3) 102 (4) 80

---

83. एक रिकामा जलतरण तलाव एका निश्चित गतीने पाण्याने भरला जात आहे व $\frac{3}{5}$ क्षमतेसाठी त्याला भरायला 8 तास लागतात. संपूर्ण तलाव भरायला अजून किती वेळ लागेल?

(1) 5 तास 30 मि. (2) 5 तास 20 मि. (3) 13 तास 20 मि. (4) 6 तास 20 मि.

An empty pool being filled with water at a constant rate takes 8 hours to fill $\frac{3}{5}$ of its capacity. How much more time will it take to fill the pool completely ?

(1) 5 hrs 30 min (2) 5 hrs 20 min (3) 13 hrs 20 min (4) 6 hrs 20 min

---

84. एक आयताचे मोजमाप करतांना एका बाजुचे माप 5% नी वाढले तर दुसऱ्या बाजुचे माप 10% कमी झाले तर आयताच्या क्षेत्रफळाचे मोजमाप करताना आलेल्या त्रुटीची टक्केवारी किती?

(1) 5.1% (2) 5.5% (3) 7.5% (4) 10%

In measuring the sides of a rectangle, there is an increase of 5% on one side and 10% decrease on the other side. Then the absolute error percentage in the calculation of area of the rectangle is ___________.

(1) 5.1% (2) 5.5% (3) 7.5% (4) 10%

---

85. एका दंडगोलाकार खांबाच्या वक्र पृष्ठभागाचे क्षेत्रफळ 352 मीटर$^2$ आहे आणि त्याचे घनफळ 2464 मीटर$^3$ आहे तर खांबाची उंची किती असेल ?

(1) 4 मीटर (2) 3 मीटर (3) 2 मीटर (4) 5 मीटर

The curved surface of a cylindrical pillar is 352 $m^2$ and its volume is 2464 $m^3$. What is the height of the pillar ?

(1) 4 m (2) 3 m (3) 2 m (4) 5 m

---

86. एक कंपनी इलेक्ट्रॉनिक उपकरणाची निर्मिती करते. त्या उपकरणाची किंमत ठरविताना कंपनी स्वत:साठी 10% नफा, घाऊक व्यापाऱ्यांसाठी 20% नफा व किरकोळ व्यापाऱ्यांसाठी 30% नफा अंतर्भूत करते. त्या उपकरणाची ठरविलेली किंमत त्याच्या निर्मितीमूल्यापेक्षा किती टक्के जास्त आहे ?

(1) 60 (2) 70.6 (3) 71.6 (4) 75

A company manufactures electronic equipment. While deciding price of that equipment, the company includes 10% profit for itself. 20% profit for wholesaler and 30% profit for retailer. By how much percent is the decided price more than manufacturing cost of that equipment ?

(1) 60 (2) 70.6 (3) 71.6 (4) 75

---

87. एका देशातील राज्यांची संख्या व केंद्रशासित प्रदेशांची संख्या यांचे गुणोत्तर 52 : 13 आहे. त्या देशातील राज्यांची संख्या केंद्रशासित प्रदेशांच्या संख्येपेक्षा किती टक्क्यांनी जास्त आहे ?

(1) 20 (2) 40 (3) 60 (4) 80

In a country the ratio of number of states to number of union territories is 52 : 13. By how much percentage is the number of states more than the number of union territories in that country ?

(1) 20 (2) 40 (3) 60 (4) 80

---

88. वर्ष 2024 मध्ये मोबाइल वापरणाऱ्यांची टक्केवारी 43% वरून 65% झाली. तर 43% च्या तुलनेत किती टक्के वाढ झाली ?

(1) 22.12 (2) 45.27 (3) 51.16 (4) 80.30

Mobile users percentage increased from 43% to 65% in the year 2024. What is the percentage increase relative to 43% ?

(1) 22.12 (2) 45.27 (3) 51.16 (4) 80.30

---

89. 3 पुरुषांनी केलेल्या कामाचे प्रमाण 5 मुलांनी केलेल्या कामाइतके आहे. तसेच 5 महिलांनी केलेल्या कामाचे प्रमाण 8 मुलांनी केलेल्या कामाइतके आहे. जर ते काम पूर्ण करण्यासाठी 12 पुरुष व 14 मुलांना 24 दिवस लागत असतील तर ते काम पूर्ण करण्यासाठी 9 पुरुष, 15 महिला व 12 मुलांना किती दिवस लागतील ?

(1) 16 (2) 18 (3) 20 (4) 26

The amount of work done by 3 men is same as that done by 5 boys. Similarly, the amount of work done by 5 women is equal to that done by 8 boys. If 12 men and 14 boys require 24 days to finish the work, then how many days will be needed for 9 men, 15 women and 12 boys to complete the work ?

(1) 16 (2) 18 (3) 20 (4) 26

---

**90.** दहा पुस्तकांची सरासरी किंमत ₹ 16 आहे व त्यातील दोन पुस्तके सोडल्यास इतर आठ पुस्तकांची सरासरी किंमत ₹ 9.5 आहे. जर त्या दोन पुस्तकांपैकी एकाची किंमत दुसऱ्याच्या किंमतीचे 40% अधिक असल्यास त्या दोन पुस्तकांची प्रत्येकी किंमत किती ?

(1) ₹ 35 व 49 (2) ₹ 40 व 24 (3) ₹ 25 व 12 (4) ₹ 30 व 18

The average price of 10 books is ₹ 16 while the average price of eight books is ₹ 9.5, of the remaining two books. If the price of one book is 40% more than the price of the other. What is the price of each of these two books ?

(1) ₹ 35 and 49 (2) ₹ 40 and 24 (3) ₹ 25 and 12 (4) ₹ 30 and 18

---

**91.** 1 ते 100 च्या अंकांमध्ये असे किती अंक आहेत जे 4 ने पूर्ण भाग जाणारे आहेत आणि त्यामध्ये '4' हा अंक सुद्धा आहे ?

(1) 7 (2) 10 (3) 16 (4) 20

How many numbers from 1 to 100 are there each of which is exactly divisible by 4 and also has '4' as digit in it ?

(1) 7 (2) 10 (3) 16 (4) 20

---

**92.** 21 मुलींच्या रांगेमध्ये, जेव्हा मोनिकाला उजवीकडे चौथ्या जागेवर हलवले जाते, तर ती रांगेच्या डाव्या बाजूने 12व्या जागी येते. तर तिची हलवण्याआधीची रांगेच्या उजव्या बाजूने कितवी जागा होती ?


(1) 9वी (2) 10वी (3) 11वी (4) 14वी

In a row of 21 girls, when Monika was shifted by four places towards the right, she became 12th from the left end. What was her earlier position from right end of the row before shifting ?

(1) 9th (2) 10th (3) 11th (4) 14th


---

**93.** खालील आकृतीत प्रश्न चिन्हाच्या ठिकाणी कोणता अंक येईल ?




(1) 18 (2) 45 (3) 196 (4) 190

In the following diagram what is the correct figure at question mark ?




(1) 18 (2) 45 (3) 196 (4) 190

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK


94. सान्वी युविकापेक्षा उंच आहे पण निलाक्षपेक्षा नाही. चैताली नमितापेक्षा उंच आहे पण युविकापेक्षा नाही. तर त्यांच्यातील सर्वात उंच कोण ?

(1) निलाक्ष (2) युविका (3) नमिता (4) सान्वी

Sanvi is taller than Yuvika but not as tall as Nilaksh. Chaitali is taller than Namita but not as tall as Yuvika. Who among them is the tallest ?


(1) Nilaksh (2) Yuvika (3) Namita (4) Sanvi

95. '$x$' ची किंमत शोधा.




(1) 72 (2) 38 (3) 02 (4) 71

Find out the value of '$x$'.




(1) 72 (2) 38 (3) 02 (4) 71

96. खालील प्रश्नात एक संख्या श्रेणी दिलेली आहे, ज्यात एक संख्या चुकीची आहे. ती चुकीची संख्या शोधा.

2, 12, 66, 297, 1485, 5940, 20790.


(1) 12 (2) 66 (3) 297 (4) 1485

In a following question, a number series is given in which one number is wrong. Find out that wrong number.


2, 12, 66, 297, 1485, 5940, 20790.

(1) 12 (2) 66 (3) 297 (4) 1485


97. खालील आकृत्यांचे निरीक्षण करून दिलेल्या पर्यायांतील प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा **अचूक** पर्याय निवडा.





तर




?


(1) 

(2) 


(3) 

(4) 


Observe the figures below and identify which figure from the given option should come in place of the question mark. Select the **correct** option :





then




?


(1) 

(2) 

(3) 


(4) 

98. खालील आकृतीतील त्रिकोणांची संख्या शोधा.



(1) 18 (2) 17 (3) 23 (4) 21

Find the number of triangles in the following figure.



(1) 18 (2) 17 (3) 23 (4) 21

---

99. दोन संख्यांचा गुणाकार 50 आहे आणि त्या संख्या 1 : 2 या प्रमाणात आहेत. तर त्या संख्यांची बेरीज किती ?

(1) 10 (2) 15 (3) 20 (4) 25

The product of two numbers is 50 and those numbers are in the ratio of 1 : 2. Then what is the sum of those numbers ?

(1) 10 (2) 15 (3) 20 (4) 25

---

100. COUPLE = 312611125 तर DOUGHT = ?

(1) 41267820 (2) 2212619187 (3) 412678711 (4) 4126787

COUPLE = 312611125 then, DOUGHT = ?

(1) 41267820 (2) 2212619187 (3) 412678711 (4) 4126787

---

- o O o -

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

## सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**